# राशिभविष्य़ - मार्च, २०११.

दादा दामले (dadadamle@hotmail.com)

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींना शनि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल होईल. तरीही दिनांक ५ ते ७ हे तीन दिवस नोकरी-व्यवसायात मनस्तापाचेच जाण्याची शक्यता दिसते. लाभस्थानातील रविमुळे या राशीच्या शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्यांना महिन्याच्या पूर्वार्धात विविध प्रकारचे लाभ होणे संभवते, या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. पण सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र कष्टाने व परिश्रमानेच अर्थप्राप्ती करून घ्यावी लागेल. मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. अध्यात्म व समाजसेवा क्षेत्रात कार्यरत असणारांना गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व सुखशांती देणारा असल्याचा अनुभव येईल. पण हा गुरु कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने प्रतिकुल व अपेक्षाभंगकारकच ठरण्याची शक्यता आहे. तरीही महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र या राशीच्या सर्वांनाच कमीजास्त प्रमाणात प्रतिकुलतेलाच सामोरे जावे लागणार आहे. जपा.

**(२) वृषभ -** या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणाऱ्या मंडळींना, शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचाच अनुभव येईल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून काही नवीन करावेसे वाटेल. या राशीच्या स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना अनेक अडचणींना तोंड देत अपेक्षापूर्तीसाठी धडपडावे लागेल. पण द्रव पदार्थाचे व्यापारी व मानसोपचारत यांना मात्र काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळींना मौल्यवान गोष्टींचा लाभ होईल तर काहीजणांना मैत्रीत वितुष्ट आल्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शुक्रामुळे या राशीच्या काहीजणांना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. महिन्याचा अखेरचा सप्ताह मात्र या राशीच्या सर्वच कलाक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या मंडळींना विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना कसल्या तरी त्रासाने अस्वस्थता व जडत्व येऊन काही करू नयेसे वाटेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते; तर धनस्थानी असलेल्या केतुमुळे काहींना आर्थिक चिंता त्रस्त करतील. जपा.

**(३) मिथुन -** या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनिमुळे या राशीच्या मंडळींना विविध कारणांनी गृहसौख्यात बाध येत असल्याचा अनुभव येईल. पण बुधाच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान मिळू शकेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अनपेक्षितपणे धनलाभ व नवे मित्र लाभण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या स्वराशीच्या गुरुमुळे शिक्षणक्षेत्र व उच्च बौद्धिक संशोधन क्षेत्रांत कार्यरत असणारांना, मुत्सद्दी, राजकारणी मंडळींना अनपेक्षित लाभदायक घटना घडत असल्याचा अनुभव येईल. अध्यात्मात कार्यरत असणारांना उपासनेत प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. काहींना सूचक स्वप्ने पडतील. महिन्याच्या पूर्वार्धात मात्र प्रवासात त्रास

होणे संभवते. तसेच मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांचा त्रास सहन करावा लागेल. शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना मान, प्रतिष्ठा, प्राप्त होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सर्वांनाच थोरकृपा लाभून सुखसमाधान लाभेल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींचा स्वभाव या महिन्याच्या काळात लहरी होईलसे दिसते. या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात जीवनसाथीस कसला तरी त्रास असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध-शुक्राच्या अनुकुलतेने विविध प्रकारचे लाभ होतील. पण रवि-मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागून उष्णताविकारांचा त्रास सहन करावा लागेल. त्याचप्रमाणे जीवनसाथी व मुले यांचे आजारपण निस्तरावे लागेल.तसेच भावंडांशी वाद मतभेद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. असह्य त्रास होण्याची शक्यता आहे. नोकरीत वरिष्ठांशी वाद, मतभेद होणे संभवते. भाग्यस्थानी असलेल्या गुरु-हर्षलमुळे अध्यात्म व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना अपेक्षित प्रगती साधणे शक्य होईल. प्रगतीच्या विविध संधी चालून येतील. तसेच वकिली, अन्य चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांनाही काल अनुकुल व लाभदायक होईल. जलभय, अपघातभय आहे. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीय मंडळींशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे विविध प्रकारचे लाभ होतील.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींचा शनिच्या साडेसातीचा आठ महिन्यांचा काळ अद्याप बाकी आहे. यापूर्वीचा काळ भरपूर असह्य मनस्ताप देणरा असा सिद्ध झाला असेल तर आता शनिदेव प्रसन्न होऊन सुख-शांति-समाधान देण्याचाच प्रयत्न करतील. या राशीच्या धनस्थानी शनि असल्यामुळे आर्थिक व्यवहार सावधानतेने व कोणावरही फ़ाजील विश्वास न धरता सुरक्षिततेची काळजी घेऊनच करणे अगत्याचे होईल. अशी काळजी घेऊनही अनपेक्षित आर्थिक खर्च करावा कागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या ज्या मंडळींना अगदी सहज वाममार्ग धन उपलब्ध होणे शक्य आहे त्यांनी साडेसातीच्या काळात या मार्गाचा अवलंब करू नये. आजवर जपलेली प्रतिष्ठा क्षणात धुळीला मिळेल. जपा. या राशीच्या मंडळींच्या जीवनसाथीस कसला तरी असह्य त्रास सहन करावा लागेल. तसेच या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या ज्या मंडळींचा व्यवसाय भागीदारीत असेल त्यांनी भागीदारीत गैरसमज निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी. तसेच ज्यांची कोर्टप्रकरणे चालू असतील त्यांनीही तारखा पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. कौटुंबिक सुखात व संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. अकारण दगदग करू नये.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींचा शनिच्या साडेसातीचा मधला काळ सध्या चालू आहे. त्यामुळे त्यांनी सतत सावधानतेनेच सर्व आचरण करावे. तसेच काळ प्रतिकुल आहे हे सतत ध्यानात घेऊनच मन सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा व संयम आणि सहनशीलतेचा सतत अवलंब करून दैनंदिन व्यवहार करावेत. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल. आपल्याच राशिस्थानी सध्या शनि असल्यामुळे विविध कारणांनी मनस्ताप सहन करावा लागून गहरे नैराश्य येऊ शकेल. काहींना दूरच्या प्रवासास जावे लागेल; तर काहींच्या कुटुंबात स्थलांतरामुळे दुरावा निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे स्वत:च्या व जीवनसाथीच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यताही नाकारता

येत नाही.या राशीच्या चतुर्थ स्थानी राहू असल्याने कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. पण पंचम स्थानी असलेल्या शुक्रामुळे परिस्थिती अटोक्यात राहील. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह नोकरी-व्यवसायास पूरक असेल; पण उत्तरार्धात अनारोग्यकारक असाच सिद्ध होईल. रविप्रमाणे मंगळही अनारोग्यकारकच होणार असून उष्णताविकार, रक्तविकार, हृदयविकार अशापैकी आजार निर्माण करील. तसेच वैवाहिक जीवनातील सुखासही बाधक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात भागीदारी व्यवसाय असणारांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलावीत. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग संभवतो.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना नुकतीच शनि ग्रहाची साडेसाती सुरू झाली आहे. पण आपली राशी शनिची उच्च राशी असल्याने इतर राशीच्या मंडळींना शनीच्या साडेसातीचा जेवढा त्रास सहन करावा लागतो तेवढा तुलनात्मक दृष्ट्या तुळा राशीच्या मंडळींना सहन करावा लागत नाही असा अनेकांचा अनुभव आहे. त्यामुळे फ़ार चिंता करू नका. सध्या शालेय, महाविद्यालयीन व अन्य परीक्षांचा काळ चालू आहे. म्हणून या राशीच्या विद्यार्थ्यांनी आपले संपूर्ण आरोग्य उत्तम राखून व मन आणि बुद्धी स्थिर, शांत ठेवून मनापासून परीक्षेची तयारी करणे आवश्यक होईल. अनारोग्य व मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना यांमुळे अभ्यासात बाधा येऊ देऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला स्वराशीचा गुरु व उत्तरार्धात रवि आरोग्य उत्तम राखण्यास मदत करतील. तरीही महिन्याच्या उत्तरार्धात उष्णताविकारांचा त्रास होण्याची शक्यता आहेच. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नोकरी-व्यवसायातील प्रगतीस महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल होईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. दिनांक २१-२२ हे दोन दिवस असह्य मनस्ताप देणारे असण्याची शक्यता दिसते. जपा.

**(८) वृश्चिक -** कौटुंबिक जीवनातील कलह, विरोध, मतभेद यांमुळे या राशीच्या स्त्रियांना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक असे खूप कष्ट पडणार आहेत. या राशीच्या काही मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करील; तर काहींना कुटुंबात घडणाऱ्या असमाधानकारक घटना, राहत्या जागेबाबतची समस्या अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. पण शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या काही भाग्यवंतांना भूमिलाभ होणे शक्य दिसते. तसेच काही मंडळींना मान-सन्मान, प्रतिष्ठा प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. रवि-मंगळ पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी घरीदारी सर्व ठिकाणी मनाविरुद्ध घटना घडणार असल्याचे गृहीत धरूनच अहंकारी स्वभावाला मुरड घालून, मनावर ताबा ठेवून, मन शांत, स्थिर राखून संयम व सहनशील बनून नम्रतेचे आचरण केल्यास फ़ारसे नुकसान न होता प्रतिकुल काळ घालवणे सहज शक्य होईल. " महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती " हे संत तुकारामाचे वचन आचरणात आणणेच सुखाचे होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी आपले सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखून व मन आणि बुद्धी स्थिर, शांत ठेवून मनापासून अध्ययन करावे; तरच गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने परीक्षाकाळात मनापासून आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जाणे व अपेक्षित यश प्राप्त करणे शक्य होईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने वैवाहिक व कौटुंबिक जीवनात अपेक्षित सुखसमाधान लाभू शकेल. तसेच कुटुंबात शुभ घटना घडतील. अपेक्षित अर्थलाभ होत असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक आर्थिक लाभ होतील.

नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असल्याने त्यांनी जे काही साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने महिन्याच्या पूर्वार्धातच अपेक्षित गृहसौख्य मिळू शकेल. पण नातेवाईकांशी भांडणे होण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे गृहसौख्यात विविध कारणांनी बाधाच निर्माण होत असल्याचा अनुभव येईल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना व शास्त्रीय संशोधन कार्यात रत असणारांना काळ इतरांपेक्षा तुलनात्मक दृष्ट्या बरा जाईल. पण अन्य प्रकारची नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र काळ क्रांतिकारक असल्याचीच भावना होईल. नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाचे तर काहींना जलप्रवासाचे योग येतील. या राशीच्या काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतीलसे दिसते,.

**(१०) मकर -** नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या राशीच्या मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईलसे दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरीत असणारांचे वरिष्ठांकडून कौतुक होईल. रवि-मंगळाच्या अनुकुलतेने या राशीच्या काही कर्तृत्वसंपन्न मंडळींना उच्च पद, मानसन्मान प्राप्त होणेही शक्य आहे. महिन्याच्या पूर्वार्धात मात्र घरीदारी विरोधी परिस्थितीलाच तोंड द्यावे लागेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला शनि अनुकुल झाला नाही तरी प्रतिकुल मात्र मुळीच होणार नाही. त्यामुळे या राशीच्या काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात थोडी बाधा येऊ शकेल; पण हा राहू हितशत्रूंपासून रक्षणही करू शकेल. व काही मंडळींना परदेशप्रवासाची संधीही देईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या गुरु-हर्षलमुळे ग्रंथलेखनकला अवगत असलेल्या या राशीच्या काही मंडळींचे ग्रंथ प्रकाशित होतील; तर शास्त्रीय संशोधनकार्यातील कर्तृत्वामुळे या राशीच्या अशा संशोधकांचा परदेशात मनसन्मान होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासातील प्रगतीचे दृष्टीने काळ अनुकुल होईल. या राशीच्या सर्वच मंडळींना या महिन्याचा काळ सर्वसाधारणपणे सुखासमाधानाचाच जाईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ विशेष करून आरोग्याच्या दृष्टीने फ़ारसा अनुकुल नाहीच असेच म्हणावे लागेल. रवि-मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागून शारीरिक उष्णता भडकेल व  उष्णताविकारांना तोंड द्यावे लागेल. रकतदाब, ह्रदयविकार असणारांनी विशेष काळजी घेऊन मन शांत व स्वस्थ राखण्याचा प्रयत्न करावा. स्वाभाविक दोषांवर नियंत्रण ठेवूनच प्रतिकुल काळावर मात करणे शक्य होईल. पण शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या युवकांनी कुसंगतीपासून दूर राहण्यातच त्यांचे कल्याण आहे. अशांत व अस्थिर मनाने कोणतेही कार्य करू नका. नुकसान होणे संभवते. या राशीच्या मंडळींचे मन सध्या विविध प्रकारच्या आघातांमुळे अतिशय हळवे झाले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे काहीही मनाविरुद्ध घडले तरी चटकन गहरे नैराश्य येईल. जपा. अशा परिस्थितीत सहनशील बनून, मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून व जिभेला लगाम घालून आचरण करणेच सुखाचे होईल. महिन्याच्या पूर्वार्धात चिकित्सक बौद्धिक संशोधऩ क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. राहू-केतुच्या अनिष्टतेमुळे संततिबाबत कसली तरी चिंता त्रस्त करील. या राशीच्या अल्पसंख्य मंडळींना अशांत मन व
अपेक्षाभंगामुळे एखाद्या मोठया आजाराला तोंड द्यावे लागेल. जपा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात रवि, मंगळ, बुध व शनि हे सर्व

महत्त्वाचे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे मानसिक मनस्ताप, शारीरिक अनारोग्य, आर्थिक चिंता, दु:ख, नैराश्य, पराजय, नियोजित कार्यात अडथळे येणे अशा प्रकारचे अनुभव येतील. महिन्याच्या पूर्वार्धात काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन त्यांमुळे जीव हैराण होईल. नोकरी-व्यवसायाचे ठिकाणी मात्र अपेक्षेपेक्षा अधिक मनोनुकुल घटना घडतील. तसेच शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक जीवनातही काही मनोनुकुल घटना घडतील व त्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. गुप्त पोलीस विभागात कार्यरत असणारांना कर्तृत्व सिद्ध करण्यास काळ अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर व लहरी होईल, कसलेही दडपण सहन होणार नाही  व या राशीची लहान  मुले नको इतकी हूड होतील व त्यांच्या खोडयांनी त्यांचे पालक त्रस्त होतील. शास्त्रीय संशोधन क्षेत्र, बौद्धिक लेखनक्षेत्र, अशा कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना गुरुच्या अनुकुलतेने प्रगती व प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते. एकंदरीत या राशीच्या मंडळींच्या जन्मकुंडलीतील योगानुसार कमी अढिक प्रमाणात सुखदु:खाचे अनुभव येतील.

-----00000-----